## पणन वार्ता माहे जानेवारी २०१९

दै. सामना दि. २३/०१/२०१९

# पणन मंडळाकडून परराज्यांत व्यापार प्रतिनिधींची नेमणूक

## देशांतर्गत व्यापाराला चालना देण्याचा प्रयत्न

पुणे, दि. २ (प्रतिनिधी) - कृषी पणन मंडळाकडून देशांतर्गत व्यापाराला चालना देण्यासाठी पहिल्यांदाच परराज्यांत व्यापार प्रतिनिधींची नियुक्ती करण्यात आली आहे. त्या राज्यातील मागणी असलेल्या शेतमालाचा अभ्यास करणे, शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपन्या, सहकारी संस्था संबंधितांना तेथे शेतमाल पाठवू शकतील अशांना माहिती पुरविणे, तसेच त्या राज्यातील खरेदीदार, सध्याचे भाव आणि मागणी याबाबतही महाराष्ट्रातील उत्पादकांना साहाय्यभूत करणारे कामकाज या व्यापार प्रतिनिधींकडून अपेक्षित आहे.

महाराष्ट्र देशात फळे, भाजीपाल्यांच्या उत्पादनासाठी अग्रेसर असून देशातून निर्यात होणाऱ्या फळे आणि भाजीपाल्यांपैकी साधारण ६० टक्क्यांपर्यंतचा वाटा हा महाराष्ट्राचा असतो. त्यामुळे परकीय चलन मिळण्याच्या दृष्टीने निर्यात जरी महत्त्वाची असली तरी एकूण उत्पादनापैकी १० ते १५ टक्क्यांपेक्षा अधिक शेतमाल निर्यातक्षम दर्जाचा नसतो. अनेकवेळा देशातील इतर राज्यांत महाराष्ट्रात उत्पादित होणारा शेतमाल पाठविला तर चांगला परतावा शेतकऱ्यांना मिळत असल्याचा अनुभव आहे. निर्यातीबरोबरच देशांतर्गत बाजारपेठांचा शोध घेऊन तेथे राज्यातील शेतमाल पाठविल्यास शेतकऱ्यांच्या उत्पन्नात निश्चितच वाढ होऊ शकतो, या हेतूने सहकार, पणनमंत्री सुभाष देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली प्रथमच इतर राज्यात शेतमाल व्यापारवृद्धीसाठी पणन मंडळाने शेतमाल व्यापार प्रतिनिधी नियुक्त केले आहेत, अशी माहिती मंडळाचे कार्यकारी संचालक सुनील पवार यांनी दिली.

संबंधित शेतमाल व्यापार प्रतिनिधी नुकतेच त्या-त्या राज्यात रुजू झाले आहेत. राजस्थान आणि तमिळनाडू राज्यांतील संबंधित अधिकाऱ्यांनी या संकल्पनेचे स्वागत करून सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. त्या राज्यातील मागणी असलेल्या शेतमालाचा अभ्यास करणे, शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपन्या, सहकारी संस्था संबंधितांना तेथे शेतमाल पाठवू शकतील अशांना माहिती पुरविणे तसेच त्या राज्यातील खरेदीदार, सध्याचे भाव आणि मागणी याबाबतही महाराष्ट्रातील उत्पादकांना साहाय्यभूत करणारे कामकाज या व्यापार प्रतिनिधींकडून अपेक्षित आहे. सुरुवातीस आठ राज्यांत कृषी पणन मंडळामार्फत ४५ दिवसांच्या कालावधीसाठी हे व्यापार प्रतिनिधी नेमणूक करण्यात आले असून, या कालावधीतील अनुभव लक्षात घेऊन पुढील निर्णय घेण्यात येणार असल्याचेही त्यांनी दिली.

या नेमणुकीमध्ये एम. जी. जोशी यांची चंदीगड, हरियाणा, पंजाबसाठी (९४२२३९२२३८), जे. बी. जगताप तमिळनाडू (८६९८७६५९७५), आर. जे. गोरे नवी दिल्ली (९५१८७२५६२९), एम. के. फळे पश्चिम बंगाल (९८५०४०८६८३), एस. डी. मेहेरकर आसाम (९८२२३९८६२३), एफ. एफ. सिद्दीकी राजस्थान (९४२१०८६०८६) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. संबंधितांनी वर नमूद केलेल्या शेतमाल व्यापार प्रतिनिधींशी संपर्क साधून शेतमालविक्रीचे नियोजन करावे, असे आवाहन पणन मंडळातर्फे करण्यात आले आहे.

पुढारी दि. १०/०१/२०१९

# कृषी पणन मंडळाचे निर्यातीबाबत काम पथदर्शी

## केंद्रीय व्यापार आणि उद्योग मंत्रालयाच्या बैठकीत मंडळाचा गौरव

**पुणे : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाने कृषी निर्यातविषयक केलेल्या कामाबद्दल केंद्रीय व्यापार आणि उद्योग मंत्रालयाने गौरव केला आहे. एवढेच नाही तर मंडळाच्या पद्धतीचे पथदर्शक कामकाज देशातील इतरही राज्यांनी करावे, अशा सूचनाही केंद्राने याबाबत बोलाविलेल्या एका बैठकीत केल्यामुळे मंडळाच्या कामकाजाची दखल घेतली गेली आहे.

देशातील सर्व राज्यांच्या कृषी निर्यात धोरणावरील महत्त्वपूर्ण बैठक केंद्रीय व्यापार आणि उद्योग मंत्री सुरेश प्रभू यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी (दि.८) दिल्लीत झाली. त्यास कृषी विभागाचे अधिकारी आणि नीती आयोगाचे सदस्य व विविध राज्यांच्या पणन विभागाचे अधिकारी उपस्थित होते. राज्यातून या बैठकीस कृषी आयुक्त सचिंद्रप्रताप सिंह, पणन संचालक दीपक तावरे, पणन मंडळाचे अधिकारी सतीश वराडे उपस्थित होते.

केंद्रीय मंत्रिमंडळाने ६ डिसेंबर २०१८ रोजी कृषी निर्यात धोरणाला मान्यता दिली आहे. अशा प्रकारचे धोरण देशात प्रथमच राबवण्यात आले असून २०२२ पर्यंत देशातील कृषिमाल निर्यात वाढविण्यावर भर देण्यात आलेला आहे. त्यामध्ये मंडळाने सुचविलेल्या बदलांचा अंतर्भाव करण्यात आलेला आहे. याबाबतच्या झालेल्या बैठकीत देशातील विविध राज्यांच्या कृषी निर्यातविषयक कामकाजाबाबत व अडीअडचणींबद्दल चर्चा झाली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सहकार व पणन मंत्री सुभाष देशमुख, कृषी व पणन राज्यमंत्री सदाभाऊ खोत यांच्या मार्गदर्शनात कृषी पणन मंडळामार्फत कृषी मालाच्या निर्यात वृद्धीच्या दृष्टीने सातत्याने प्रयत्न करण्यात येत असल्याचे मंडळाचे कार्यकारी संचालक सुनील पवार यांनी सांगितले.

### सुविधा केंद्रांमधून ७५ हजार मे.टन माल निर्यात

राज्य कृषी पणन मंडळाच्या निर्यातविषयक सर्व प्रयत्नांमुळे राज्यातील विविध कृषिमालाची जगात सुमारे १८० देशांमध्ये निर्यात होत आहे. मंडळाच्या पुढाकाराने उच्च तंत्रज्ञानावर आधारित विकिरण सुविधा केंद्र, व्हेपर हीट ट्रीटमेंट सुविधा केंद्रांसह ४५ सुविधा निर्माण करण्यात आल्या. त्यातून राज्यात शीतगृह, प्रशीतकरण, रायपनिंग चेंबर्स, पॅकिंग, ग्रेडिंगची क्षमता निर्माण होण्यास मदत झाली. त्याचा परिणाम म्हणून आजमितीस फळे व भाजीपाल्याची निर्यात युरोप, अमेरिका, मध्य आशियायी देशात नियमितपणे होत असल्याचे सुनील पवार यांनी सांगितले.



महाराष्ट्र टाईम्स दि. १०/०१/२०१९

# शेतमालाची समुद्रमार्गे निर्यात केल्यास अनुदान

## कृषी पणन मंडळाची योजना

म. टा. प्रतिनिधी, पुणे

समुद्रमार्गे शेतमाल निर्यातीसाठी कृषी पणन मंडळामार्फत अनुदान योजना लागू करण्यात आली आहे. राज्यातील शेतमालाच्या निर्यातीस प्रोत्साहन देण्यासाठी ही योजना जाहीर करण्यात आली असून, यासाठी शेतमालाची समुद्रमार्गे निर्यात करणे बंधनकारक असणार आहे.

बहुतांश वेळा हा शेतमाल विमानाद्वारे परदेशात पाठविला जातो. मात्र, विमानाद्वारे निर्यात करणे अधिक खर्चिक ठरते. त्यामुळे समुद्रमार्गे शेतमालाची निर्यात व्हावी यासाठी ही योजना सुरु करण्यात आली आहे. याचा फायदा शेतकऱ्यांसह उत्पादकांना फायदा होणार आहे.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतमालाची समुद्रमार्गे निर्यात करणे बंधनकारक आहे. समुद्रमार्गे निर्यात



केल्यास लाभार्थ्यांस प्रतीकंटनेर ३० हजार रुपये अनुदान देण्यात येणार असून प्रतीवर्ष एक लाखापर्यंत ते वाढवण्यात येणार आहे. अनुदान योजना आंबा, संत्रा, डाळिंब, केळी, भाजीपाला, कांदा या शेतमालालाच लागू राहणार आहे, अशी माहिती कृषि पणन मंडळाचे कार्यकारी संचालक सुनील पवार यांनी दिली.

योजनेची माहिती आणि अटी www.msamb.com या संकेतस्थळावर वर उपलब्ध आहे. राज्यातील शेतकरी, शेतकरी गट, फर्म, निर्यातदार, कंपनी, सहकारी संस्था आदींनी योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

अॅग्रोवन

# ‘ई-नाम’द्वारे देशातील बाजार समित्या सशक्त करणार

## केंद्रीय कृषिमंत्री राधामोहनसिंह ; क्रॉप केअर फाउंडेशन ऑफ इंडियाची मुंबईत परिषद



**मुंबई (प्रतिनिधी) :** देशातील सर्व बाजार समित्या ‘ई-नाम’ प्रकल्पाच्या माध्यमातून सशक्त करण्याला केंद्र शासनाने प्राधान्य दिले असून, याद्वारे शेतकऱ्यांना सक्षम करताना बाजार समित्यांच्या जोखडातून शेतकऱ्यांना मुक्त करावयाचे आहे, असे प्रतिपादन केंद्रीय कृषिमंत्री राधामोहनसिंह यांनी केले.

क्रॉप केअर फाउंडेशन ऑफ इंडियाद्वारे बुधवारी (ता. २३) आयोजित ‘शेती अधिक किफायतशीर करण्यासाठी सरकार, उद्योग आणि शेतकरी एकत्र काम करू शकतात’ या विषयावरील एकदिवसीय परिषदेमध्ये ते बोलत होते. या वेळी केंद्रीय कृषी राज्यमंत्री पुरुषोत्तम रूपाला, राज्याचे कृषिमंत्री चंद्रकांत पाटील, अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार, आमदार आशिष शेलार, यूपीएलचे अध्यक्ष रज्जू श्रॉफ, कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव एकनाथ डवले, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठचे कुलगुरू डॉ. विलास भाले आदी उपस्थित होते.

श्री. सिंह म्हणाले, की आज देशातील शेतकऱ्यांसमोर अनेक अडचणी आहेत. या अडचणी दूर करावयाच्या असतील तर सरकार आणि उद्योगपतींनी एकत्र येऊन कृषी क्षेत्राला मदतीची गती वाढवण्याची गरज आहे. शेतकरी जगला तर देश जगेल हे आपण लक्षात घेतले पहिजे. कृषी क्षेत्रासाठी केंद्र सरकारने मोठ्या प्रमाणात अर्थिक तरतूद उपलब्ध करून दिली आहे. महाराष्ट्र सरकारनेही कृषी केंद्रित अनेक निर्णयांची अंमलबजावणी केली आहे. ‘जलयुक्त शिवार’सारख्या महत्त्वाकांक्षी योजनेने राज्यातील अनेक गावे जलसंपन्न झाली आहेत.

शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकार अनेक योजना राबवीत आहे, ज्याद्वारे त्यांना आर्थिक आणि सामाजिक सुरक्षा मिळत आहे. यामध्ये कृषिपूरक उत्पादनांवर आधारित उद्योगांची भूमिका महत्त्वाची आहे. मोदी सरकारने राष्ट्रीय आपत्ती निधीतून भरघोस मदत केली आहे. पंतप्रधान पीकविमा योजनेतून शेतकऱ्यांना नुकसानभरपाई दिली जात आहे.

**‘कृषी संशोधनावर लक्ष केंद्रित करण्याची गरज’**

शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असून, या क्षेत्रावर मोठ्या प्रमाणावर रोजगार अवलंबून आहे. त्यामुळे आधुनिक पद्धतीने शेती करताना शेती क्षेत्रात नावीन्यपूर्ण संशोधन होणे काळाची गरज आहे. ही बाब लक्षात घेऊन कृषी विद्यापीठांनी कृषी केंद्रित संशोधनावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक असल्याचे मत अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केले. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यात आणि त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यामध्ये असे संशोधन उपयुक्त ठरणार असल्याने कृषी विद्यापीठात कृषी आधारित संशोधन केंद्र निर्माण करावे, अशी सूचनाही त्यांनी या वेळी केली.

या वेळी डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास भाले, रज्जू श्रॉफ यांची भाषणे झाली. परिषदेच्या सुरवातीला यवतमाळ आणि अकोला जिल्ह्यांतील प्रगतिशील शेतकऱ्यांचा १० मिनिटांचा लघुपट दाखविण्यात आला. तसेच ‘यू टर्न स्टोरी यवतमाळ बुक’ पुस्तिकेचेही प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते झाले.

Pune, Main
24/01/2019 Page No. 2

सकाळ अॅग्रोवन

# शेतमाल तारण योजनेतून ११२ कोटींचे वाटप

## कार्यकारी संचालक पवार; तीन महिन्यांत ६७ कोटींचे विक्रमी वाटप

**पुणे (प्रतिनिधी) :** शेतमालाची काढणी झाल्यानंतर बाजारात मोठ्या प्रमाणात आवक होऊन दर पडल्यानंतर शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होते. हे नुकसान टाळण्यासाठी कृषी पणन मंडळाने बाजार समित्यांमधून सुरू केलेल्या शेतमाल तारण योजनेत यंदाच्या सुगी हंगामात ऑक्टोबर २०१८ ते १५ जानेवारीदरम्यानच्या अवघ्या तीन महिन्यांत ६७ कोटी ३४ लाख रुपयांचे तारण कर्ज देण्यात आले आहे. हे कर्ज मंडळाच्या इतिहासातील सर्वाधिक कर्ज असल्याची माहिती मंडळाचे कार्यकारी संचालक सुनील पवार यांनी दिली. तर गेल्या १२ महिन्यांत सुमारे ४५ कोटी २२ लाख रुपयांचे असे एकूण ११२ कोटी रुपयांचे वाटप करण्यात आल्याचे श्री. पवार यांनी सांगितले.

या वेळी बोलताना पवार म्हणाले, ''कृषी पणन मंडळाच्या वतीने बाजार समित्यांच्या माध्यमातून १९९० पासून शेतमाल तारण कर्ज योजना राबवित आहे. शेतमालाच्या काढणी हंगामात शेतमालाची ठी आवक झाल्यावर दर कमी होतात. यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत होते. हे टाळण्यासाठी शेतमाल तारण योजना राबविण्यात येत आहे. यंदाच्या चालू हंगाम २०१८-१९ मध्ये केवळ तीन महिन्यांत तारणात ठेवलेला शेतमाल व वाटप केलेली तारण कर्जाची रक्कम विचारात घेता पणन मंडळाने या योजनेच्या गेल्या २८ वर्षांच्या इतिहासातील सर्वाधिक वाटप करण्यात आले आहे.

**शेतमाल तारण योजना राबविणारे एकमेव पणन मंडळ**

**गेल्या २८ वर्षांपासून शेतमाल तारण योजना राबविणारे महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ हे देशपातळीवरील एकमेव पणन मंडळ आहे. याची नोंद केंद्र शासनामार्फत घेण्यात आलेली आहे, असे या वेळी पवार यांनी सांगितले.**

या योजनेमध्ये शेतकऱ्यांनी बाजार समिती अथवा वखार महामंडळाच्या गोदामात ठेवलेल्या शेतमालाच्या एकूण किमतीच्या ७५ टक्क्यांपर्यंतची रक्कम ६ महिने कालावधीसाठी ६ टक्के व्याज दराने तारण कर्ज देण्यात येत आहे. यामध्ये तूर, मूग, उडीद, सोयाबीन, सूर्यफूल, चना, भात (धान), करडई, ज्वारी, बाजरी, मका, गहू, वाघ्या घेवडा (राजमा), काजू बी, बेदाणा, सुपारी व हळद इतर शेतमालासाठी तारण कर्ज देण्यात येते. तसेच ही योजना राबविण्यासाठी स्वनिधी उपलब्ध नसलेल्या बाजार समित्यांना पाच लाख इतका अग्रिम निधी पणन मंडळाकडून देण्यात येतो. तर उर्वरित बाजार समित्यांनी वाटप केलेल्या तारण कर्जाची १०० टक्के प्रतिपूर्ती राज्य कृषी पणन मंडळामार्फत करत असल्याचेही पवार यांनी सांगितले.

| ऑक्टोबर २०१७ ते सप्टेंबर २०१८ दरम्यानचे वाटप | |
|---|---|
| बाजार समित्या | १३८ |
| शेतकरी संख्या | ५ हजार ४८४ |
| तारण शेतमालाचे कमाल वजन | २ लाख २५ हजार ३४९ क्विंटल |
| शेतकऱ्यांना वाटप तारण क र्ज | ४५ कोटी २२ लाख रुपये |

| यंदाच्या सुगी हंगामातील आकडेवारी (ऑक्टोबर २०१८ ते १५ जानेवारीपर्यंत) | |
|---|---|
| बाजार समित्या | १३७ |
| सहभागी शेतकरी संख्या | ८०५५ |
| तारण ठेवलेला शेतमाल | ३ लाख ३४ हजार १०४ क्विंटल |
| वाटप केलेले कर्ज | ६७ कोटी ३४ लाख रुपये |

अग्रोवन

# ई-नाम प्रणालीत २५ हजारांवर शेतकऱ्यांची नोंदणी

## अमरावती बाजार समितीचा पुढाकार

**अमरावती (प्रतिनिधी)** : ई-ट्रेडिंग (ई-नाम) प्रणालीचा अवलंब अमरावती बाजार समितीत करण्यात येत आहे. या अंतर्गत सुमारे २५ हजार शेतकऱ्यांनी नोंदणी केल्याची माहिती बाजार समितीकडून देण्यात आली.

अमरावती बाजार समितीत ई-नाम कक्ष स्थापन करण्यात आला आहे. बाजार समितीत होणारी १०० टक्के आवक ई-गेट एंन्ट्रीद्वारे होते. सद्यःस्थितीत बाजार समितीत ई-नाम पोर्टलवर २५ हजार ५८५ शेतकऱ्यांची नोंदणी करण्यात आली आहे. या सुविधेचा प्रभावी वापर होण्यासाठी पुढील महिन्यात होणाऱ्या अडते, खरेदीदारांच्या परवाना नूतनीकरणात ई-नाम योजनेच्या अंमलबजावणीसाठी अटी, शर्तीमध्ये बदल करण्यात आला आहे. या कार्यप्रणालीमुळे शेतकऱ्यांच्या खात्यात शेतीमाल विक्रीची रक्कम तत्काळ जमा होईल, अशी माहिती बाजार समिती सभापती अशोक दहिकर यांनी दिली. १६ जानेवारीला लोणी येथील महिला शेतकरी प्रणिता प्रकाश देशमुख यांनी ई-नामद्वारे ६.५० क्विंटल तूर विक्रीकरिता अडते नरेश ट्रेडर्स यांच्याकडे आणली. खरेदीदार गिरीश अग्रवाल यांनी ई-ट्रेडिंगद्वारे सर्वाधिक बोली लावली. ई-वेट झाल्यानंतर या महिला शेतकऱ्याच्या खात्यात १६ हजार ६९६ रुपये जमा करण्यात आले.

ई-ट्रेडिंग प्रणालीचा अवलंब करण्यात आल्याने अमरावती बाजार समितीने आपला १२३ एकरांवरील परिसर 'वाय-फाय'खाली आणला आहे. अडते, खरेदीदार, शेतकऱ्यांनी ई-नाम पोर्टलवर नोंदणी केल्यास त्यांना प्रतिदिवस एक जीबी डाटा मोफत उपलब्ध करून दिला जाणार असल्याचे अशोक दहिकर यांनी सांगितले. त्याकरिता ई-नाम अॅप डाऊनलोड करावे लागणार आहे.

Pune, Main
23/01/2019 Page No. 3